२०११०४३०११०९१७००१

सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत लहान व मध्यम शहरांतील पायाभूत सुविधांचा विकास कार्यक्रम (UIDSSMT) या उपअभियानाखाली अनुदान वितरण

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन निर्णय क्र. युआयडी-२०११/प्रक्र-१२८/नवि-३३

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक : ३१ मार्च,२०११

संदर्भ: १) केंद्रीय वित्त मंत्रालयाचे आदेश क्र. एफ-५९ (१०)/पीएफ-१/२००७-२००७, दिनांक २३ मार्च,२०११.

२) शा.नि. क्र. एमयुआरएम-१००७/३५६/प्र.क्र.७२/०७/नवि-३३, दिनांक १६ जुलै, २००७

प्रस्तावना : नागरीकरणाचा वाढता वेग व व्याप्ती विचारात घेवून केंद्र शासनाने देशातील लहान व मध्यम शहरांमध्ये पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी जाहिर करण्यात आलेल्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाचे उपअभियान (UIDSSMT) अंतर्गत महाराष्ट्रातील महानगरपालिका / नगरपरिषदा यांचे शहर विकास आराखडे (CDPs) व सविस्तर प्रकल्प अहवाल (DPRs) महाराष्ट्राच्या राज्यस्तरीय मंजुरी समितीच्या मान्यतेने केंद्र शासनास सादर करण्यात आले होते. केंद्र शासनाने सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील महानगरपालिका/ नगरपरिषदेच्या सादर प्रकल्पांना मंजुरी देवून संदर्भाधिन क्र. १ येथील आदेशान्वये राज्यातील सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेस निधी वितरीत केला आहे.

उक्त योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र शासनाने मंजूर केलेल्या प्रकल्प किंमतीपैकी केंद्र शासन, राज्य शासन व महानगरपालिका यांच्या हिश्श्याचा मंजूर आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे

UIDSSMT अंतर्गत मंजूर प्रकल्पाची एकूण किंमत	केंद्र शासनाचा हिस्सा	राज्य शासनाचा हिस्सा	महानगरपालिकेचा हिस्सा
१००	(८० %)	(१० %)	(१० %)

या योजनेअंतर्गत केंद्रीय निधी प्राप्त होण्यासाठी केंद्र शासनासोबत राज्य शासन व उपरोक्त नमूद महानगरपालिकेनी सक्तीच्या व वैकल्पिक सुधारणा क्षेत्रांत प्रगती करण्याबाबत करारनामा केला आहे. हा करारनामा झाल्यानंतर केंद्र शासनाने संदर्भाधिन पत्रानुसार राज्यातील सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेस निधी वितरीत केला असून त्याचे विवरण पुढीलप्रमाणे आहे :-

(रु.कोटीत)

अ. क्र.	स्थानिक स्वराज्य संस्थेचे नांव	योजना	केंद्र शासनाने वितरीत रक्कम
१	कोल्हापूर	भुयारी गटार योजना	१२.८९२०
२	लातूर	वाहनतळ	०.१६८०

[illegible]	पाणीपुरवठा योजना	[illegible]
[illegible]	पाणीपुरवठा योजना	[illegible]
[illegible]	पाणीपुरवठा योजना	[illegible]
	एकूण	[illegible]

शासन निर्णय : केंद्र शासनाने वितरीत केलेली रक्कम वितरीत करण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निधी वितरणास मान्यता देण्यात येत आहे. सदर रकमेचे **वितरण दुस-या इप्त्यापोटी करण्यात येत आहे.**

(रु. कोटीत)

अ. क्र.	नागरिक स्वराज्य संस्थेचे नांव	योजना	केंद्र शासनाची वितरित रक्कम
[illegible]	कोल्हापूर	भुयारी गटार योजना	[illegible]
[illegible]	[illegible]	वाहनतळ	[illegible]
[illegible]	[illegible]	पाणीपुरवठा योजना	[illegible]
[illegible]	[illegible]	पाणीपुरवठा योजना	[illegible]
[illegible]	[illegible]	पाणीपुरवठा योजना	[illegible]
	एकूण		[illegible]

यासाठी संचालक तथा आयुक्त, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे व सहाय्यक संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, [illegible], मुंबई यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. [illegible] व [illegible], मुंबई यांनी सदर एकत्रित अनुदान रु. <u>[illegible],५९,०००/-</u> (रुपये अडोतीस कोटी, [illegible] लाख, एकोणसाठ हजार फक्त) इतक्या रकमेचा धनादेश आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई (Commissioner & Director of Municipal Administration, Mumbai) या नावे काढावा आणि त्यांनी सदर रकमेचे वितरण संबंधित महानगरपालिकेस तत्काळ करावे.

०२. उपरोक्त तक्त्यात नमूद महानगरपालिकेने त्रिपक्षीय करारनाम्यात नमूद केलेल्या सुधारणांबाबत सर्वनिहाय केलेली प्रगती पाहून तसेच वितरित केलेल्या अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र मिळाल्यानंतर योजनेअंतर्गत केंद्र शासन व राज्य शासनाचा पुढील हिस्सा वितरित करण्यात येईल.

०३. केंद्र शासनाकडून प्रत्यक्ष पाहणीद्वारे या योजनेअंतर्गत प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या सर्व टप्प्यांच्या क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेण्यात येईल. सदर महानगरपालिकेने दर तीन महिन्यांनी राज्यस्तरीय नोडल एजन्सीमार्फत राज्य तसेच केंद्र शासनाच्या हिश्याच्या अनुदानाच्या विनियोगाबाबतचा अहवाल राज्य शासन तसेच केंद्र शासनास सादर करावा. अशाप्रकारे तिमाही अहवाल सादर करण्यास विलंब झाल्यास त्यांना पुढील हिस्सा प्रलंबित विनियोग अहवाल प्राप्त होईपर्यन्त वितरित करण्यात येणार नाही.

०४. प्रस्तुत योजनेअंतर्गत सर्व प्रकल्पांची अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर या योजनेमधून काय साध्य झाले याबाबतचा अहवाल सदर महानगरपालिकेने राज्य शासन व केंद्र शासनास सादर करावा.

०५. सदर नगरपरिषद/ महानगरपालिकेस देण्यात येणाऱ्या रु. **३८,७४,५९,०००/-** (रुपये अडतीस **कोटी, चौ-याहत्तर लाख, एकोणसाठ हजार फक्त)** इतक्या रकमेचा खर्च हा मागणी क्र. एफ-२, २२१७, नगर विकास, केंद्रसहायीत योजना,(००) (४८) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत महानगरपालिकांना सहाय्यक अनुदान (२२१७१४०१),३१- सहाय्यक अनुदान (वेतनेतर) दत्तमत १९१- महानगरपालिकांना सहाय्य" लेखाशिर्षाखाली सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षातील मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

०६. सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३७२/११/अर्थ-१६, दिनांक ३१/०३/२०११ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रा. वि. कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति ---

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ , मुंबई
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- २ , नागपूर
३) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
४) अधिदान व लेखाधिकारी, (कोर्ट) मुंबई
५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६) प्रधान सचिव, वित्त / प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-३० तथा नोडल एजन्सी
८) आयुक्त / मुख्याधिकारी, संबंधित महानगरपालिका / नगरपरिषद